ePaper

**भारत चंद्रावर अंतराळवीर पाठवणार? पंतप्रधान मोदींची मोठी घोषणा!**

| वर्ष - 7 | अंक - 209 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- फिरकीचा नवा बादशाह मिळाला!
- फालतू सिनेमे ब्लॉकबस्टर ठरले
- गडचिरोली पोलिसांना मोठे यश!
- विरोधकांसाठी आता सुपारी पान ठेवू !

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 7 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ‘अहंकारी नेत्यांमुळे जनतेचे नुकसान’!

## » एकनाथ शिंदे यांची ठाकरेंवर नाव न घेता टीका, विरोधकांवर हल्लाबोल

| नागपूर | महाईन्यूज |

**राज्याचे हिवाळी अधिवेशन आज, गुरुवारपासून नागपुरात सुरू होत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहापानानंतर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये शिंदे बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार उपस्थित होते. शिंदे यांनी नुकत्याच पाच राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या मुद्द्यावरून विरोधकांना लक्ष्य केले. ‘पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीमध्ये तीन राज्यांत भाजपला यश मिळाल्याने विरोधी पक्षाचे अवसान गळाले आहे. लोकशाहीमध्ये जनता जनार्दनाचा कौल महत्त्वाचा असतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिष्मा संपला असे म्हणणाऱ्यांना देशातील जनतेने जागा दाखवून दिली असून त्यांनी मोदी यांच्या गॅरंटीवर विश्वास ठेवला आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीनंतर मोदी पुन्हा पंतप्रधान होतील याची हमी आता जनतेनेच देऊन टाकली आहे’, असे शिंदे म्हणाले.**



‘आमच्याकडे स्वाभिमान नसल्याचे विरोधक सांगत आहेत. वास्तविक ज्यांना मॅडमच्या परवानगीशिवाय नाक खाजवायची परवानगी नाही, त्यांनी आमच्यावर आरोप करायचे? स्वाभिमानाची भाषा करायची? आम्ही दिल्लीला केंद्रातून निधी आणण्यासाठी जातो. राज्याच्या विकासासाठी निधी मागितल्याशिवाय मिळत नाही. त्यासाठी प्रयत्न करावा लागतो. गेल्या अडीच वर्षांत अंहकारामुळे हे घरातून बाहेर पडले नाहीत. त्यांच्या अहंकारामुळे केंद्र सरकारने पैसे दिले नाहीत. राज्याचे नुकसान झाले. अनेक प्रकल्प बंद




पाडले तर यांनी काही प्रकल्प स्थगित केले. आमचे सरकार आल्यापासून मेट्रो, आरेपासून अनेक प्रकल्प सुरू केले. हे सर्व प्रकल्प बंद पाडण्याचे काम त्यांनी केले. त्यांनी जलयुक्त शिवारसारख्या प्रकल्पाची चौकशी सुरू केली’, अशा शब्दांत शिंदे यांनी विरोधकांवर आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षावर टीका केली.

### ‘टिकणारे आरक्षण देऊ, विश्वास ठेवा!’

» ‘आम्ही आरक्षणाबाबत सुरुवातीपासून सकारात्मक भूमिका घेतली आहे. मराठा समाजाला आरक्षण देत असताना ओबीसी आणि इतर समजावर अन्याय होणार नाही. कुणाचेही आरक्षण कमी केले जाणार नाही, ही आमची भूमिका स्पष्ट आहे. मुंबईमध्ये दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेऊन आम्ही आरक्षणाबाबत हमी दिली आहे. आमच्या सरकारची भूमिका मराठा समाजास आरक्षण देण्याची आहे’, असे शिंदे म्हणाले. मराठा समाजाला आम्ही टिकणारे आरक्षण देणार असून त्यांनी आमच्यावर विश्वास ठेवावा. नोदींच्या संदर्भामध्ये शिंदे कमिटी काम करत आहे. याबाबतचा जीआर आधीचा असून आम्ही नवीन काम करत नाही. ज्या जुन्या नोंदी आहेत, वंशावळी, रक्ताची नाती आहेत, याबाबत नोंदी सुरू आहेत’, असे आवाहन शिंदेंनी यावेळी केले. ‘आम्ही ओबीसी समाजासोबतही बैठक घेतली. त्यांनाही आरक्षणाबाबत चिंता करू नका, असे सांगितले.

### गृहविभाग आपले काम करेल

» कायदा आणि सुव्यवस्था तसेच भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून सरकारवर टीका करणाऱ्या विरोधी पक्षाला शिंदे यांनी शायरीतून उत्तर दिले. ‘मुंह खोलने से पहले सोचना सीख लें, पहले तो अपने अंदर झाँक के देख लें!’, असे म्हणत तुम्ही लोक आधी तुमचे बघा आणि मग सरकारवर टीका करा, असे त्यांनी सुनावले.

### चहापानावर विरोधकांचा बहिष्कार

» ‘राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, आरोग्य विभागातील भ्रष्टाचार, अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान व अजूनही न मिळालेली भरपाई यांसारख्या मुद्द्यांवरून सरकारच्या गृह, आरोग्य आणि कृषी विभागाला लक्ष्य करण्यात येणार असल्याचे संकेत विरोधकांनी बुधवारी दिले. ‘तुमच्या चहापेक्षा आम्हाला शेतकऱ्यांचे अश्रू महत्त्वाचे आहेत’, असे सांगत हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापानावर बहिष्कार टाकला.

# महिलांसाठी पुणे असुरक्षितच, विनयभंग-अपहरणाच्या गुन्ह्यांमध्ये वाढ!

## » अल्पवयीन मुलींना अधिक धोका : पुणे राज्यात चौथ्या स्थानी, शहरात गेल्या वर्षी 2074 गुन्हे दाखल

| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी |

देशात महिला अत्याचाराच्या घटनांचे प्रमाण वाढत असतानाच या गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर असल्याची माहिती राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालात नमूद करण्यात आली आहे. राज्यात गेल्या वर्षी ४५ हजार ३३१ गुन्हे दाखल झाले असून, सर्वाधिक गुन्हे मुंबईत नोंदवले गेले आहेत. पुणे राज्यात चौथ्या स्थानी असून, शहरात गेल्या वर्षी २०७४ गुन्हे दाखल झाले.

देशभरातील गुन्ह्यांची सद्यस्थिती दर्शविणारा 'राष्ट्रीय



गुन्हे नोंदणी अहवाल' नुकताच प्रसिद्ध झाला. देशात मुली, महिलांचे अपहरण, महिलांचा छळ, विनयभंग, बलात्कार, आत्महत्येस प्रवृत्त करणे, महिलांवरील हल्ले आदी गंभीर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे.

### पुण्यात विनयभंगाचे 474 गुन्हे

देशातील प्रमुख महानगरांत विनयभंग केल्याप्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यांचा विचार केल्यास २०२२मध्ये पुण्यात ४७४ गुन्हे दाखल आहेत.

### पुण्यात अल्पवयीन मुलींना धोका

» महिला आणि तरुणींना जाळ्यात ओढून त्यांचे अपहरण करण्याचे सर्वाधिक गुन्हे उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये दाखल आहेत. महाराष्ट्रात १८ हजार ७२४ गुन्हे दाखल असून, पुणे शहरात १,१३९ गुन्हे घडले आहेत. मुंबई आणि पुण्यासारख्या मोठ्या शहरात अल्पवयीन मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून पळवून नेण्याचे प्रकार वाढत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांची पायपीट थांबणार!

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मोफत बस सेवा सुरू

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक, नागरिकांसाठी मोफत बससेवा पूर्ववत करण्यात आली आहे. त्यामुळे मुख्य प्रवेशद्वार ते विद्यापीठातील विविध ठिकाणी बसने जाणे शक्य झाले असून, येत्या काळात बससेवेसाठी स्वतंत्र उपयोजन ( ॲप्लिकेशन) विकसित करण्याचे विद्यापीठ प्रशासनाचे नियोजन आहे.**




विद्यापीठाला दोन बस दत्तक मिळाल्या होत्या. त्यानंतर विद्यापीठ परिसरासाठी बससेवा सुरू करण्यात आली होती. मात्र काही कारणाने ती सुरू राहू शकली नाही. विद्यापीठाचा आवार मोठा असल्याने स्वतःचे वाहन नसलेले विद्यार्थी, नागरिकांना अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने पुन्हा एकदा बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून विविध ठिकाणी सहज पोहचणे शक्य झाले आहे. सकाळी साडेदहा वाजल्यापासून मुख्य प्रवेशद्वारापासून मोफत बससेवा उपलब्ध करण्यात आली आहे.

विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर म्हणाले, की बससेवेसाठी ठिकठिकाणी थांबे करण्यात आले आहेत. सध्या किती विद्यार्थी, नागरिकांकडून या बससेवेचा वापर केला जातो याचा आढावा घेण्यात येत आहे. त्यानुसार येत्या काळात या बससेवेसाठी उपयोजनाची निर्मिती करण्यात येणार आहे. या उपयोजनावर बस किती वेळात थांब्यावर पोहोचेल याची माहिती मिळेल. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील (Savitribai Phule Pune University) परिसरात ये-जा करण्यासाठी विद्यापीठाच्यावतीने मोफत बस सेवा सुरू करण्यात आली आहे. सकाळी 10:30 वाजतापासून सुरू होणारी ही सेवा विद्यापीठ परिसरातील सर्व महत्त्वाच्या ठिकाणी विद्यार्थी आणि नागरिकांना पोहचण्यात मदत करणार आहे. यामुळे विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. विद्यापीठाचा परिसरात मोठा असल्याने स्वतःचे वाहन नसलेल्या विद्यार्थी, प्राध्यापक, सेवक आणि नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने ही सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या सेवेसाठी विद्यापीठातर्फे दोन बसेसे देण्यात आल्या आहेत. मुख्य प्रवेशद्वारापासून ही सेवा उपलब्ध असून विद्यापीठाच्या सर्व प्रमुख विभाग आणि कार्यालयासमोर जवळपास 13 बस थांबे सुरू करण्यात आले आहे.

भविष्यात विद्यार्थी आणि नागरिकांचा प्रतिसाद बघता थांब्यांच्या संख्येत वाढ करण्यात येणार आहे. तसेच ठिकठिकाणी यासंदर्भात फलकही लावण्यात येणार आहेत. याशिवाय येत्या काळात बससेवेसाठी स्वतंत्र उपयोजन (ॲप्लिकेशन) विकसित करण्याचे विद्यापीठ प्रशासनाचे नियोजन आहे. या सेवेमुळे विद्यार्थी, प्राध्यापक, सेवक आणि नागरिकांना निश्चित मदत होणार आहे. हा प्रवास अधिक सुलभ व्हावा यासाठी विद्यापीठातर्फे ॲप तयार केले जाणार आहे. ज्यामुळे बस नेमकी कुठे आहे, किती वेळात कोणत्या थांब्यावर पोहचेल यांची माहिती वापरकर्त्यांना मिळेल, असं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी यांनी सांगितलं.विद्यापीठात आल्यावर विद्यार्थी, नागरिकांना आधी खुप पायपीट करावी लागायची. मात्र प्रशासनाने दोन सीएनजी बसेसे पुरवून ही सेवा सुरू केल्यामुळे त्यांना दिलासा मिळाला आहे. या इको-फ्रेंडली सेवेचा जास्तीत जास्त लोकांना उपभोग घेता येईल यासाठी भविष्यात यात आणखी चांगले बदल करण्यात येईल, असं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे यांनी सांगितलं आहे.

### बसचे थांबे कोणते असतील?


सावित्रीबाई फुले विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक, नागरिकांसाठी मोफत बससेवा पूर्ववत करण्यात आली आहे. त्यामुळे मुख्य प्रवेशद्वार ते विद्यापीठातील विविध ठिकाणी बसने जाणे शक्य झाले असून, येत्या काळात बससेवेसाठी स्वतंत्र उपयोजन ( ॲप्लिकेशन) विकसित करण्याचे विद्यापीठ प्रशासनाचे नियोजन आहे विद्यापीठाचा मुख्य प्रवेशद्वार, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा, जयकर ज्ञानस्त्रोत केंद्र (जयकर ग्रंथालय), रसायनशास्त्र विभाग, परिक्षा विभाग, आंतरराष्ट्रीय केंद्र, मुख्य इमारत, तंत्रज्ञान विभाग, मुलींचे वसतीगृह, आरोग्य केंद्र, पुंबा, मुलांचे वसतीगृह, मुख्य प्रेवशद्वार. सकाळी 10:30 पासून दर अर्ध्या तासाला ही बस चालणार आहे.

# कोऱ्या पानांना विद्यार्थ्यांची पसंती!

## ऑनलाइन सर्वेक्षणाचा अहवाल जाहीर

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यातील दुसरी ते आठवीच्या पुस्तकांना जोडलेल्या वह्यांच्या कोऱ्या पानांना विद्यार्थ्यांची पसंती मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने (बालभारती) केलेल्या सर्वेक्षणात ९७ टक्के शिक्षक, ९१. ७७ टक्के पालकांनी, ६८.९० टक्के विद्यार्थ्यांना कोरी पाने आवडत असल्याचे सांगितले आहे. तसेच सर्वेक्षणातून अनेक विद्यार्थ्यांना एकात्मिक पाठ्यपुस्तके मिळाली नसल्याचेही समोर आले.**



बालभारतीने यंदापासून पहिली ते आठवीपर्यंतच्या पुस्तकांच्या रचनेत बदल केला. त्यात दुसरी ते आठवीच्या पुस्तकांमध्ये वह्यांची पाने जोडण्यात आली. या कोऱ्या पानांवर विद्यार्थ्यांनी महत्त्वाच्या नोंदी करणे अपेक्षित आहे. या उपक्रमाची उपयोगिता तपासण्यासाठी बालभारतीकडून शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांचे ऑनलाइन सर्वेक्षण करण्यात आले. त्यात एकात्मिक पाठ्यपुस्तके, वह्यांच्या पानाचा उपयोग या अनुषंगाने १२ प्रश्न विचारण्यात आले होते. या सर्वेक्षणाचा अहवाल बालभारतीकडून जाहीर करण्यात आला. वर्गात वह्यांच्या पानांवर नोंदी घेत असल्याचे ९६.४९ टक्के विद्यार्थ्यांनी सांगितले. १३.६९ टक्के विद्यार्थी कधीतरीच या पानांचा वापर करतात. पुस्तकातील पानांवर विद्यार्थ्यांनी घेतलेल्या नोंदी ९३.७२ टक्के पालक पाहतात. ३.८८ टक्के विद्यार्थ्यांच्या मते शिक्षकांनी या नोंदी पाहिलेल्याच नाहीत. ४६.४१ टक्के पालकांच्या मते विद्यार्थी या पानांचा वापर स्वयंअध्ययनासाठी वापर करतात. एकात्मिक पाठ्यपुस्तकांमुळे दप्तराचे ओझे कमी झाल्याचे ३८.२५ टक्के पालकांनी, ९६.७९ टक्के शिक्षकांनी सर्वेक्षणात सांगितले.

अनेक विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मिळाली नसल्याचे उघड सर्वेक्षणातून अनेक विद्यार्थ्यांना सर्व पाठ्यपुस्तके मिळाली नसल्याचे उघडकीस आले. १६ हजार ३८६ विद्यार्थ्यांना सर्व चार पाठ्यपुस्तके मिळाली. तर ८४४ विद्यार्थ्यांना तीन, ३ हजार ७२९ विद्यार्थ्यांना दोन, तर १ हजार २३४ विद्यार्थ्यांना एकच पाठ्यपुस्तक मिळाले.

# सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड शनिवारी पुण्यात!

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड शनिवार आणि रविवारी पुणे दौऱ्यावर येत आहेत. पुण्यातील लवळे येथील एका खासगी विद्यापीठाच्या पदवीप्रदान कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत. तसेच लोणावळा येथील कैवल्यधाम येथील योग संस्थेला भेट देणार आहेत. त्यांचा पुण्यात एक दिवस मुक्कामही असणार आहे. पुणे दौऱ्यासाठी सरन्यायाधीश चंद्रचूड हे दिल्ली येथून मुंबईत येणार आहेत. मुंबईहून ते पुण्याला येणार आहे. एक दिवस त्यांचा पुण्यात मुक्काम असणार आहे. पुण्यातील एका खासगी विद्यापीठाच्या पदवीप्रदान सोहळ्यासाठी चंद्रचूड उपस्थित राहणार आहेत. तसेच लोणावळा येथील कैवल्यधाम येथील योग संस्थेला भेट देणार आहेत. त्यानंतर ते दिल्लीकडे प्रयाण करणार आहेत. न्यायमूर्ती चंद्रचूड हे मूळचे पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील कनेरसर गावचे आहेत. कनेरसर येथे त्यांचा वाडा आहे. या ठिकाणी सन २०१६ मध्ये कनेरसर येथे चंद्रचूड एका कार्यक्रमानिमित्त आले होते. त्यावेळी त्यांनी या वाड्याला भेट दिली होती. पुणे दौऱ्यासाठी सरन्यायाधीश चंद्रचूड हे दिल्ली येथून मुंबईत येणार आहेत. मुंबईहून ते पुण्याला येणार आहे.

# ‘एमपीसीबी’चा महापालिकेला इशारा!

## नद्यांच्या प्रदूषणाबाबत नोटीसः पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, मुळा आणि इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातून वाहणाऱ्या पवना, मुळा व इंद्रायणी नद्यांच्या प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्डाने (एमपीसीबी) महापालिकेला नोटीस बजाविली आहे. हरित लवादाच्या निर्देशानुसार संपूर्ण सांडपाणी प्रक्रिया न केल्याबद्दल आपल्यावर दंड का करू नये, बँक हमी का जप्त करू नये, असा जाबही विचारण्यात आला. १५ दिवसांमध्ये कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.**





पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, मुळा आणि इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. नदीतील पाण्यावर तवंग येत आहेत. नद्यांच्या प्रदूषणाबाबत कृषी, पर्यावरण, शिक्षण आणि नागरी समस्या निवारण संघटनेचे अध्यक्ष सूरज बाबर यांनी महापालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड, पर्यावरण विभाग, केंद्र सरकार यांच्याकडे पाठपुरावा केला. या पाठपुराव्याची दखल घेत एमपीसीबीने महापालिकेला प्रदूषणाबाबत नोटीस बजावली आहे.

प्रक्रिया न केलेले सांडपाणी, औद्योगिक रसायन मिश्रित पाणी मिसळून नद्या फेसाळत आहेत. पाण्याची गुणवत्ता ढासळत आहे. जलपर्णीही वाढत असल्याचे नोटिशीत म्हटले आहे. कोणतीही प्रक्रियाविना सांडपाणी रावेत येथे थेट नदीमध्ये सोडल्याचे, औद्योगिक सांडपाणी तळवडे, चिखली, कुदळवाडी, मोशी, रामदरा नाल्यामधून इंद्रायणी नदीमध्ये सोडल्याचे नमूद केले असून, यात नियमांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट केले आहे.

### बँक हमी का जप्त करू नये

‘एमपीसीबी’ने महापालिका सहशहर अभियंता व यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तिंवर पाणी, (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायद्यान्वये खटला का दाखल करू नये, हरित लवादाच्या निर्देशानुसार संपूर्ण सांडपाणी प्रक्रिया न केल्याबद्दल दंड का करू नये, त्याचबरोबर महापालिका संमतीपत्रात दिलेल्या नियमांचे उल्लंघन करत असल्यामुळे तुमची बँक हमी का जप्त करू नये, अशीही विचारणा केली आहे.

---

# माजी नगरसेविकेच्या पतीची सहाय्यक आरोग्य अधिकाऱ्याला मारहाण

## कर्मचाऱ्याला नोटीस दिल्याचा राग, भोसरीतील ‘ई’ क्षेत्रीय कार्यालयातील घटना

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विनापरवाना गैरहजर आणि उद्धट वर्तनाबाबत कर्मचाऱ्याला नोटीस दिल्याने भाजपच्या माजी नगरसेविकेच्या पतीने महापालिकेच्या सहाय्यक आरोग्य अधिकाऱ्याला मारहाण केली. ही घटना भोसरीतील ‘ई’ क्षेत्रीय कार्यालयात घडली. याप्रकरणी राजेश नंदलाल भाट (वय ५४, रा. थेरगाव) यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार शंकर मुरलीधर सोनवणे (वय ३२, रा. बोपखेल गावठाण) आणि संतोष लांडगे (वय ४५) यांच्यासह आणखी एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



फिर्यादी भाट हे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ई क्षेत्रीय कार्यालयात सहाय्यक आरोग्य अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांनी शंकर सोनवणे यास विनापरवाना गैरहजर आणि उद्धट वर्तनाबाबत नोटीस बजावली होती. त्या कारणावरून त्याने इतर साथीदारांना घेऊन येत भाट यांना शिवीगाळ केली. मारहाण करण्यासाठी अंगावर धावून आले. अनोळखी व्यक्तीने भाट यांच्या कानशिलात लगावली.

भाट यांना मारहाण करत त्यांच्या कार्यालयात ओढून नेले. शंकर सोनवणे यांनी तुझ्या नावाने आत्महत्या करून तुझी नोकरी घालवतो अशी धमकी दिली. फिर्यादी शासकीय काम करत असताना आरोपींनी त्यांना अडथळा निर्माण केला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. संतोष लांडगे हे भाजपच्या माजी नगरसेविका सारिका लांडगे यांचे पती आहेत.

# भोसरी भूखंड गैरव्यवहार प्रकरणात एकनाथ खडसे यांना तात्पुरता दिलासा

## एकनाथ खडसे यांच्याविरुद्ध लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी येथील भूखंड गैरव्यवहार प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेले तत्कालीन मंत्री एकनाथ खडसे यांना न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला. त्यामुळे खडसे यांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. भोसरी भूखंड गैरव्यवहार प्रकरणात एकनाथ खडसे यांच्याविरुद्ध लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे. .**



या प्रकरणात खडसे यांच्याविरुद्ध लातूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आरोपपत्र दाखल केले आहे. या प्रकरणात अंतरिम जामिन मिळावा म्हणून खडसे यांनी विशेष न्यायाधीश पी. पी. जाधव यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केला होता.

विशेष न्यायाधीश जाधव यांनी खडसे यांचा अंतरिम जामीन मंजूर केला. या प्रकरणात जामीन मिळवण्यासाठी खडसे यांनी बुधवारी विशेष न्यायालयात अर्ज दाखल केला. खडसे यांच्या जामीन अर्जावर तीन जानेवारी २०२४ रोजी सुनावणी होणार आहे, अशी माहिती लाख लुचपत प्रतिबंधक विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. खडसे हे मंत्री असताना त्यांनी अधिकाराचा गैरवापर करून भोसरी परिसरातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) मालकीची ४० कोटी रुपयांची जमीन पत्नी आणि सुनेच्या नावे तीन कोटी ७५ लाख रुपयांमध्ये खरेदी केल्याचा आरोप आहे. खडसे यांनी जामीन मिळविण्यासाठी अर्ज केला होता. न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केल्यामुळे तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

# डॉ. आंबेडकरांची स्वप्ने कशी पूर्ण होणार?




**आज महापरिनिर्वाण दिन! जगात अनेक महान विभूती जन्मापासून अखेरच्या श्वासापर्यंत परोपकारांसाठी झिजतात. या देदीप्यमान महामानवांच्या रांगेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर अग्रस्थानी आहेत. काही व्यक्तींच्या कार्याचा व्यापच एवढा मोठा असतो की, एक आयुष्य अपुरे पडते, असे त्या व्यक्तीला आणि तिच्या अनुयायांनाही नेहमीच वाटते.**

ऐन उमेदीचा काळ, प्रगल्भता आणि अनेक लोकोपयोगी कामे शिल्लक असताना जीवन पटलावरून त्यांची झालेली एक्झिट ही सर्वांच्या काळजाला चटका लावून जाते! डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ६ डिसेंबर १९५६ रोजी अखेरचा श्वास घेतला आणि अक्षरशः लाखो हृदये क्षणभर थांबली! आभाळ फाटले! कुणी कुणाचे सांत्वन करावे, हे कळेनासे झाले. लोक सैरभैर झाले होते! त्यादिवशी जगाच्या इतिहासात एखाद्या व्यक्तीच्या अंत्यदर्शनाला झालेल्या गर्दीचे विक्रम मोडीत निघाले. उपेक्षित, वंचितांचा आवाज हरपला! आबालवृद्ध अंत्यदर्शनाला गेले! अनेक जण गावातच रडत बसले, तर कित्येकांनी अन्न-पाणी सोडले! संपूर्ण देश शोकसागरात बुडाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रवास अतिशय खडतर होता. त्यांच्या जीवनातील एकेका प्रसंगावर एक एक ग्रंथ लिहिता येईल, एवढा मोठा संघर्ष



करून त्यांनी विविध क्षेत्रांत उत्तुंग कार्य केले. त्यांच्या आईचे लवकर निधन झाले असले तरी सुभेदार रामजींनी आपल्या लेकरांवर सन्मानाने जगण्याचे संस्कार केले. अभ्यास, वाचन यांची शिदोरी त्यांना बालवयातच लाभली. भीमराव चिकित्सक, चाणाक्ष आणि बुद्धिमान होते. याचा परिणाम म्हणजे ते शाळेत शिक्षकप्रिय विद्यार्थी झाले. गुरुजींनी विविध ग्रंथ देऊन त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण केली. एकापाठोपाठ एक यशाची शिखरे पादाक्रांत करत असताना त्यांना परदेशी शिक्षणाची संधी मिळाली आणि त्यांनी त्या संधीचे सोने केले. अत्यंत खडतर परिस्थितीत शिक्षण घेऊन अर्थशास्त्र विषयात डॉक्टरेट मिळवून ते डॉ. भीमराव आंबेडकर झाले. परदेशातून भारतात परतताच त्यांना जातीभेदाचे प्रचंड चटके सोसावे लागले. लहानपणी अजाण असलेले बाबासाहेब आता सुज्ञ झाले होते. सुरुवातीला बडोदा संस्थानात नोकरी करण्याचा प्रयत्न केला, परंतु स्पृश्यास्पृश्यतेच्या झळांमुळे ते ती फार काळ करू शकले नाहीत. काही काळ वकिली केली, मात्र त्यांना गावकुसाबाहेरील माणसांच्या व्यथा-वेदना स्वस्थ बसू देत नव्हत्या. त्याचवेळी त्यांनी कुठेही नोकरी करायची नाही, केवळ समाजातील वंचित, उपेक्षित लोकांचा आवाज व्हायचे, असा निर्णय त्यांनी घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने आधुनिक भारताचे शिल्पकार होते. त्यांनी स्वतंत्र भारताची मजबूत उभारणी करण्यासाठी वाट निर्माण करून दिली. यामध्ये भारतीय राज्यघटना हे त्यांचे सर्वोच्च कार्य आहे. राज्यघटनेची बांधणी करताना काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतचा विविध जाती, धर्म, पंथांचा भारत देश त्यांच्या समोर होता. इथला कोणताही माणूस कोणत्याही मूलभूत हक्कांपासून, सोयी-सुविधांपासून वंचित राहणार नाही, यासाठी आवश्यक सर्व तरतुदी त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राज्यघटनेत केल्या. त्यांच्या प्रयत्नांतूनच भारतीय राज्यघटना एका अत्युच्च शिखरावर पोहोचली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय राज्यघटना वाचल्यावरच येतो.

डॉ. आंबेडकरांनी आजच्या विकसित भारताची काही स्वप्ने पहिली होती. ते किती द्रष्टे होते हे याचा प्रत्यय त्यांच्या ग्रंथांतील विचारांवरून येतो. डॉ. आंबेडकरांनी पाहिलेले स्वप्न सामाजिक- आर्थिकदृष्ट्या विकसित राष्ट्राचे होते. येथील तरुण उच्च शिक्षित, विवेकी, शीलवंत, गुणवंत, प्रज्ञावंत, मनाने व शरीराने मजबूत झाला पाहिजे, हे त्यांचे स्वप्न होते आणि त्यासाठीच 'शिका' हा महामंत्र त्यांनी दिला. शिक्षणच माणसाला सर्वांगीण विकसित आणि मजबूत करते, अशी संपूर्ण खात्री त्यांना होती. त्याशिवाय 'मी, संपूर्ण भारत बौद्धमय करेन!' ही एक महत्त्वपूर्ण प्रतिज्ञा डॉ. आंबेडकरांनी केली होती. धर्मांतर केल्यानंतर त्यांना फारसे आयुष्य लाभले नाही, मात्र त्या अल्पकाळात त्यांनी येथील गावकुसाबाहेरील लोकांना आत्मसन्मानाने जगण्याचा अधिकार देणारा धम्म स्वतः स्वीकारला आणि त्याला मुख्य प्रवाहात आणले.

## संपादकीय »

### धोक्याचे विक्रम...

***एकविसाव्या शतकातील सर्वात मोठे आव्हान म्हणून जागतिक तापमानवाढ आणि त्यामुळे होणाऱ्या हवामान बदलांचा उल्लेख केला जातो.***

मानव जातच नव्हे, तर संपूर्ण जीवसृष्टीच तापमानवाढीमुळे नष्ट होते की काय? अशी भीती पर्यावरणतज्ज्ञांना वाटते आहे. तशातच यंदाचा जुलै 2023 हा सुमारे सव्वा लाख वर्षांतील सर्वात उष्ण महिना म्हणून नोंदला गेला आहे. एका अहवालानुसार, नोव्हेंबर 2022 पासून ते ऑक्टोबर 2023 या कालावधीत 170 देशांतील सरासरी तापमान 30 वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक राहिले आहे. संपूर्ण मानवतेसाठी धोकादायक बनलेली जागतिक तापमानवाढीची पातळी ही औद्योगिक पूर्वस्थितीच्या तुलनेत 1.3 अंश सेल्सिअसची पातळी ओलांडून पुढे गेली आहे. शास्त्रज्ञांच्या मते, जुलै 2023 हा महिना आतापर्यंतचा सर्वाधिक उष्ण राहिला आणि हा सुमारे सव्वा लाख वर्षांतील सर्वात उष्ण महिना म्हणून नोंदला गेला आहे. 2023 पर्यंत जागतिक तापमानाने एक नवीन विक्रम नोंदविला. आतापर्यंतच्या इतिहासात 12 महिन्यांतील हा सर्वात उष्ण कालावधी राहिला आहे.

**इतिहास आपल्याला सांगतो की अमेरिकेहून मोठी असलेली साम्राज्ये शेकडो वर्षे जगावर सत्ता गाजवल्यानंतर देखील नष्ट झाली आहेत. अनावश्यक युद्धे, आर्थिक अस्थिरता, चलनवाढ, खालावणारे राष्ट्रीय व्यक्तित्व आणि मूलभूत शोधप्रक्रियेकडे होणारे दुर्लक्ष आणि वैचारिक नाविन्याची घुसमट यासह अनेक कारणांमुळे रोमन आणि मुस्लिम साम्राज्ये लयास गेली आणि नेमकी हीच परिस्थिती आता अमेरिकेत उदभवली आहे.**

# महासत्तांच्या स्थित्यंतरातून अलिप्ततावादच तारेल

भारताच्या दृष्टीने हा इतिहास महत्वाचा आहे. भारत हा महत्त्वाचा धोरणात्मक भागीदार असल्याचे स्पष्ट संकेत अमेरिकेने पाठवले आहेत कारण अमेरिकेला आता भारताची गरज भासते आहे.. ही भारताकरता प्रथमदर्शनी चांगली गोष्ट वाटली तरी आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की भूतकाळातील प्रत्येक साम्राज्य बुडाले आहे आणि बुडताना या साम्राज्यांनी त्यांच्या मित्रपक्षांना पण त्यांच्या बरोबर बुडवलेले आहे. त्यामुळे आपल्याला अमेरिकेवर पूर्ण विसंबून राहता येणार नाही. इतिहास तपासता लक्षात येते की पंडित नेहरूंनी अलिप्ततावादी धोरण का स्वीकारले असावे आणि हे धोरण कदाचित आपल्याला पुन्हा एकदा अवलंबावायची गरज आहे. गेल्या दोन हजार वर्षात तीन बलाढ्य साम्राज्यांनी जवळपास सर्व न्याय प्रदेशावर प्रबुध्दत्व गाजवले. रोमन साम्राज्याने साधारणपणे ७०० वर्षे दरारा ठेवला. त्यांनतरची सुमारे ७०० वर्षे मुस्लिम साम्राज्ये आघाडीवर




होती आणि त्यानंतर आत्तापर्यंत ७०० वर्षे पश्चिम युरोपने जगावर प्रभुत्व ठेवले. यापैकी आपल्या काळाला जवळचा इतिहास हा पश्चिम युरोपच्या वसाहतवाद आणि भांडवलशाहीचा आहे. सर्वज्ञात आहे की, स्पॅनियार्ड्सनी अमेरिका जिंकून त्यांची संपत्ती आणि वर्चस्व निर्माण केले. तथापि, या संपत्तीने प्रचंड भ्रष्टाचार माजवला आणि महागाई प्रचंड वाढली. नवीन सापडलेल्या संपत्तीने काही निवडक लोकांना समृद्ध केले त्यामुळे सामान्य लोकांमध्ये असंतोष वाढला. कॅथोलिक चर्चने स्वतंत्र विचारांवर गदा आणल्यानंतर लवकरच स्वतंत्र विचारसरणीचे प्रोटेस्टंट पश्चिमेकडे स्थलांतरित झाले आणि अशाप्रकाराने आर्थिक समस्या आणि धर्माबद्दल मर्यादित दृष्टिकोन या दोन गोष्टींनी स्पॅनिश साम्राज्याचा अंत झाला. तोवर ब्रिटिश त्यांची जागा घेण्यास तयार होते. स्पेनने या प्रक्रियेची सुरुवात केली असे कदाचित असले तरी भांडवलशाहीला खरा आकार दिला ते ब्रिटिशांनी. पण ब्रिटिशांना त्यांच्या व्यापारी हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी दोन महायुद्धे लढावी लागली. युद्धे जिंकली असली तरी या प्रक्रियेदरम्यान इंग्रज दिवाळखोरीत निघाले आणि आर्थिक चणचणीमुळे इंग्रजांचे साम्राज्य देखील कोसळले. भांडवलशाहीची सूत्रे ब्रिटननंतर अमेरिकेच्या हातात गेली आणि लवकरच अमेरिका जागतिक प्रबळ शक्ती म्हणून मानली गेली. परंतुअमेरिकेचे हे वर्चस्व किती काळ टिकणार आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. भांडवलशाहीचे बलस्थान म्हणजे छोटे उद्योग जे आज कोमेजत आहेत. भांडवलशाही लहान वस्तूंच्या उत्पादनातून वाढली परंतु आता असे उत्पादन मुख्यतः परदेशात गेले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# विरोधकांसाठी आता सुपारी पान ठेवू !

## विरोधकांना विदर्भशी काहीही देणं घेणं नाही : फडणवीस

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचं हिवाळी अधिवेशन 7 डिसेंबरपासून नागपूर इथं होत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सत्ताधाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. विरोधकांनी चहापानावर बहिष्कार टाकला.**






विरोधकांना विदर्भ मराठवाड्यासाशी काहीही देणं घेणं नाही हे त्यांच्या भूमिकेवरून दिसतं, असं फडणवीस म्हणाले. विरोधी पक्षांच्या दुपारच्या पत्रकार परिषदेत काही नेते झोपले होते, जसे ते तीन राज्यात झोपले, अशी कोपरखळी फडणवीसांनी लगावली. गेल्या काही दिवसांपासून चक्रीवादळामुळे देशाच्या विविध भागात पाऊस होत आहे. त्यामुळे हवामान विभागाने महाराष्ट्रातही पावसाची शक्यता ही त्या ठिकाणी वर्तवण्यात आली आहे आणि जवळपास पाच जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट देखील या ठिकाणी सांगण्यात आलेला आहे. आजच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सर्व यंत्रणेला अलर्ट राहण्याचा सल्ला दिलेला आहे. त्यासोबत ज्या ज्या ठिकाणी अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचं नुकसान झालंय किंवा होतंय. त्याठिकाणी कुठली वाट न पाहता पंचनामे करून जी काही नुकसान भरपाई आहे त्या संदर्भात राज्य सरकारकडे मागणी करण्याच्या संदर्भात देखील माननीय मुख्यमंत्र्यांनी आज प्रशासनाला निर्देश दिले आहेत. आमच्या चहापानावर बहिष्कार घातला. पण कदाचित विरोधी पक्षाचा स्वभाव पाहता पुढच्या वेळेस सुपारी पान ठेवावे लागेल म्हणजे कदाचित ते येतील अशी शक्यता मला दिसते. आज विरोधी पक्षाने न येण्याची कारणे आणि जे पत्र दिलेला आहे, मगाशी मी बघितलं की त्यांच्या पत्रकार परिषदेमध्ये काही लोक झोपी गेले होते. म्हणजे तीन राज्यात जसे झोपले तसे. पत्रकार परिषदेतील काही लोक झोपी गेले होते पण तशाच झोपेत हे पत्र लिहिले आहे का असा प्रश्न पडावा अशा प्रकारचे पत्र विरोधी पक्षाने दिलं आहे. मला आश्चर्य वाटतं नागपूरचं अधिवेशन विदर्भाच्या प्रश्नावर चर्चा व्हावी, मराठवाड्याच्या प्रश्नावर चर्चा व्हावी याकरता खऱ्या अर्थाने अधिवेशन या ठिकाणी होत असतं. पण विरोधी पक्षाच्या पत्रामध्ये विदर्भ मराठवाड्याच्या समस्यांचा उल्लेखच नाहीये. विरोधी पक्षाला विदर्भ मराठवाड्याचा संपूर्ण विसर पडलेला आहे, असं या पत्रावर न दिसतं. जीआरचा विषय काढलेला आहे खरं म्हणजे सन्माननीय तत्कालीन मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या सहीने निघालेला जीआर हा तीन महिन्यापूर्वी माननीय एकनाथरावजी शिंदे यांच्या सरकारने रद्द केला हे देखील ज्या विरोधी पक्षाला माहिती नाही, त्या विरोधी पक्षाची काय अवस्था आहे हे खरं म्हणजे आपण सगळ्यांनी हे बघितलं पाहिजे.

### सरकारकडून वेगाने हालचाली

» विशेषतः आपण जर बघितलं तर राज्यावर कर्ज वाढताय वगैरे असे अनेक मुद्दे त्यांनी मांडले आहेत. आता अजितदादा त्याच्या संदर्भात सांगतील. मी एकच आकडा जाणीवपूर्वक आपल्यापुढे ठेवतो की अर्थव्यवस्थेमध्ये किती वाढ झाली. तर 2013-14 साली आपला आपली अर्थव्यवस्था ही 16 लाख कोटींची होती. आज आपली अर्थव्यवस्था 35 लाख कोटींची झाली. म्हणजे गेल्या दहा वर्षांमध्ये अडीच पटीपेक्षा जास्त आपली अर्थव्यवस्था झालेली आहे. त्यामुळे मी कर्जाच्या संदर्भात या ठिकाणी सांगत नाही. अजितदादा की आकडेवारी आपल्याला सांगतीलच. पण मी एवढेच सांगू शकतो की आजही देशाच्या सगळ्या राज्यांच्या अर्थव्यवस्थेच्या तुलनेत असे म्हणणार नाही आम्ही श्रीमंत आहोत पण बॅलन्स अर्थव्यवस्था जर कोणाची असेल तर ती महाराष्ट्राची आहे. हे मात्र या ठिकाणी नमूद केलं पाहिजे.

# भीमराया घे तुझ्या या लेकरांची वंदना!

## आंबेडकरी गीतांचा जागर ते पुस्तक खरेदीसाठी गर्दी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर ( (DR BABASAHEB AMBEDKAR)) यांना अभिवादन करण्यासाठी आज चैत्यभूमीवर (CHAITYABHUMI) जनसागर उसळला. राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. महामानवास अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमीवर दरवर्षीप्रमाणे यंदाही लाखो नागरिकांची गर्दी उसळली होती.**



भारतातील वर्ग लढ्याला आणि जातीअंताच्या लढ्याला आकार आणि दिशा देण्याचे भरीव काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. जागतिक पातळीवर शोषण मुक्ती आणि समतेसाठीच्या लढ्यांमध्येही बाबासाहेब आंबेडकर (Dr Babasaheb Ambedkar) प्रेरणादायी ठरले आहेत. वर्ग, जात, धर्म, लिंग यांचा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार यासाठी आंबेडकरांनी काम केले होते. स्वातंत्र्योत्तर भारतात तत्कालीन अस्पृश्यांच्या स्वातंत्र्याला काहीच किंमत नसेल, तर त्यातून अधिक गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होतील. तसे होऊ नये यासाठी बाबासाहेबांनी सामाजिक सुधारणा आणि अस्पृश्यता निर्मूलन ही कार्ये करण्याला अधिक प्राथमिकता दिली. बाबासाहेब आंबेडकर हे ब्रिटिश सरकारमध्ये मजूर मंत्री होते. त्यांनी त्या कालावधीत भारतीय कामगारांसाठी अनेक मोलाचे कायदे करून घेतले. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतून भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली.

जातीव्यवस्थेने अस्पृश्य समाजाला दिलेल्या गुलामीच्या बेड्या तोडताना समाज परिवर्तनासोबत सशक्त भारताच्या निर्मितीसाठी दिशा दाखवण्याचे काम बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. बाबासाहेबांनी केलेल्या उत्तुंग कार्याने देशातील कोट्यवधी नागरिकांच्या प्रगतीचा, समान संधीचा मार्ग मोकळा केला. त्याची आठवण ठेवून महापरिनिर्वाण दिनी लाखोंचा जनसागर चैत्यभूमीवर उसळतो. पुढील महापरिनिर्वाण दिन इंदू मिल स्मारकावर अभिवादन करू.

### अनुयायांसाठी जेवणाची व्यवस्था

» सत्तेचा वापर परिवर्तनासाठी, समृद्धीचे दिवस आणण्यासाठी काम सुरू आहे. जगाला हेवा वाटेल असं हे स्मारक असणार आहे. अनेक कल्याणकारी योजना राबवत आहोत, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज मुंबई शहर आणि उपनगरामध्ये शासकीय सुट्टी जाहीर करण्यात आली होती. तर, मुंबई महापालिकेसह इतर अनेक संस्था संघटनांच्यावतीने चैत्यभूमीवर अनुयायांसाठी विविध व्यवस्था केली होती. तर, रेल्वेने अतिरिक्त वाहतूक सोडण्यात आली होती. तर, बेस्ट प्रशासनानेदेखील बसेस सोडल्या होत्या. तर, विविध संस्था, संघटनांच्यावतीने अनुयायांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती.

# जितेंद्र आव्हाडांचा अजित पवारांना टोला

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

राजकारणात वैयक्तिक टीका कुणीही कुणावर करु नये. हा असाच आहे, याची ढेरीच वाढली आहे, याच्या शर्टवर पानाचे ठिपके असतात अशी टीका कुणीही कुणावर करु नये. हे मोठ्या नेत्यांना शोभून दिसत नाही. माझ्याविषयी एवढा द्वेष कशासाठी आहे अजित पवारांना? मला जर फोन करुन त्यांनी सांगितलं की जितेंद्र पोट वाढतं आहे हार्ट अटॅक वगैरे येईल सांभाळ.

तर मला अजित पवारांविषयी आदर वाटला असता असं जितेंद्र आव्हाड म्हणाले. त्याचप्रमाणे मी इतका मोठा झालेलो नाही की शरद पवारांना काही समजून पक्ष फोडेन असाही टोला जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवारांना लगावला. भर पत्रकार परिषदेत माझं पोट हे व्यंग आहे हे दाखवण्याचा हिडीस प्रकार अजित पवार यांनी केला. द्वेषातूनच हे सगळं आलं. माझ्याविषयी इतका द्वेष का? मी तुमचा राजकीय प्रतिस्पर्धी नाही. तुमच्या मतदारसंघाताला प्रतिस्पर्धी नाही, मी तुमच्या उंचीइतका होऊच शकत नाही याची मला कल्पना आहे. माझ्या निष्ठेबद्दल जर तुम्हाला राग असेल तर तो राग सहन करण्याची ताकद मला परमेश्वराने दिली आहे. माननीय आर. आर. पाटील यांच्यावर जेव्हा टीका झाली तेव्हा ते २४ तास रडले होते. मी कितीवेळा ऐकून घेतलं आहे की तुझी दोन बटणं उघडी आहेत.

मी शर्ट कसा घालायचा? कुठल्या रंगाचा घालायचा हे काय विचारायला जायचं का? यावर पक्ष चालतो का? म्हणूनच मी म्हटलं होतं कुणाच्याही व्यक्तीगत आयुष्यावर टीका करु नका. दरवेळी काहीही झालं की जितेंद्र आव्हाड. अजित पवारांना दुसरं नाव सापडत नाही का? छोट्या समाजातला आहे, त्याला टपली मारली तर काय होतं? तसं नाही होत. मला विचारलं लोकांनी तुझ्या पक्षात तुझ्या ढेरीबद्दल बोललं जातं. युद्ध वैचारिक असलं पाहिजे.

# जम्मू काश्मिरबाबत नेहरूंच्या दोन चुका!

## शाहंच्या वक्तव्यानं काँग्रेस आक्रमक; लोकसभेत खडाजंगी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेच्या हिवाळी अधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पंडित जवाहरलाल नेहरूंबाबत दिलेल्या वक्तव्यावरुन लोकसभेत गदारोळ झाल्याचं पाहायला मिळालं. संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान लोकसभेत बोलताना गृहमंत्री अमित शहा यांनी जम्मू-काश्मीरबाबत माजी पंतप्रधान पंडित नेहरु यांनी काही 'चुका' केल्याचे म्हटले. त्यांच्या या वक्तव्यावर काँग्रेसने जोरदार प्रहार केला. लोकसभेतील काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी आरोप केला की, केंद्र सरकारचे मंत्री आणि भाजपचे अनेक नेते काश्मीरचा प्रश्न आल्यावर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यावर विनाकारण टीका करू लागतात.**



जम्मू-काश्मीरच्या संदर्भात दिवसभर सभागृहात चर्चा झाली. यावर बोलताना काँग्रेस खासदार अधीर रंजन चौधरी यांनी 'दूध का दूध और पानी का पानी', असे म्हटलं. त्यावर अशा चर्चेला मी तयार असल्याचे अमित शाह म्हणाले. दरम्यान, अमित शाह यांनी वस्तुस्थितीचा विपर्यास केल्याचा आरोप अधीर रंजन यांनी केला. जम्मू काश्मीर आरक्षण (दुरुस्ती) विधेयक, 2023' आणि 'जम्मू काश्मीर पुनर्रचना (दुरुस्ती) विधेयक, 2023' वरील चर्चेत भाग घेताना अमित शाहा यांनी पंडित नेहरूंबद्दल वक्तव्य केले होते. सभागृहात पाकव्याप्त काश्मीरचा (पीओके) उल्लेख करत गृहमंत्री यांनी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरु यांनी जम्मू-काश्मीरबाबत दोन 'चुका' केल्याचे म्हटले. शाह यांच्या वक्तव्यावर काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी टीका केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, नेहरूंच्या काळात झालेल्या घोडचूकांमुळं काश्मीरला त्रास सहन करावा लागला. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीत झालेल्या दोन मोठ्या चुका त्यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे झाल्या, ज्याचे परिणाम काश्मीरला भोगावे लागले. सर्वात मोठी चूक म्हणजे जेव्हा आपले सैन्य जिंकत होते, तेव्हा पंजाब भागात पोहोचताच युद्धविराम लागू करण्यात आला आणि पाकव्याप्त काश्मीरचा जन्म झाला.

जर युद्धविराम तीन दिवसांनी उशीर झाला असता, तर पाकव्याप्त काश्मीरचा भाग झाला असता. दुसरे म्हणजे हा मुद्दा यूएनमध्ये नेणं ही मोठी चूक झाल्याचे अमित शाह म्हणाले. भाजप नेत्यांच्या म्हणण्यानुसार, जर पंडीत नेहरु देशासाठी हानिकारक आहेत आणि तुम्ही (सरकार) देशासाठी फायदेशीर आहात, मग या विषयावर दिवसभर चर्चा व्हायला हवी. दूध का दूध आणि पानी का पानी होईल असे अधिरंजन चौधरी म्हणाले. यावर शाह म्हणाले, "मी कधीही असे म्हटले नाही की नेहरु देशासाठी हानिकारक आहेत. सत्ताधारी पक्षातील एकाही सदस्याने असे सांगितले नाही. काश्मीर समस्येच्या मूळ मुद्द्यावर चर्चा झाली पाहिजे, असे मी म्हटले आहे. याच्या मुळाशी कोण आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. काश्मीरमध्ये पंडित नेहरुंच्या काळात जी स्थिती होती त्यामुळे संयुक्त राष्ट्रात जाण्याचा निर्णय घ्यावा लागला. पूँछ आणि राजौरी वाचवण्यासाठी सैन्य वळवावं लागलं. पूँछ आणि राजौरी आज भारताचा भाग आहेत तो त्याच निर्णयामुळे आहे. काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्रांकडे नेला पाहिजे हे सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासह सगळ्यांनीच त्यांना हा सल्ला दिला होता असं जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुलांनी म्हटलं आहे. अमित शाह खोटं बोलत आहेत असं म्हणत त्यांनी अमित शाह यांच्या आरोपांवर उत्तर दिलं आहे. संयुक्त राष्ट्रांकडे जाण्याशिवाय काही पर्याय नव्हता. या ठिकाणी शांतता प्रस्थापित होण्यासाठीच पंडित नेहरु संयुक्त राष्ट्रांकडे हा प्रश्न घेऊन गेले. लॉर्ड माऊंटबॅटन आणि सरदार पटेल यांच्यासह सगळ्यांनीच हा सल्ला दिला. आता हे लोकांशी खोटं बोलत आहेत तर काय करणार? त्यावेळी भारताची परिस्थितीच अशी होती. त्यावेळी सैन्य वळवलं नसतं आणि फौजांनी राजौरी आणि पूँछ वाचवलं नसतं तर ते पण पाकिस्तानात गेलं असतं. त्यासाठीच हा निर्णय घेतला गेला असंही फारुख अब्दुलांनी म्हटलं आहे. काश्मीरमध्ये दहशतीचं वातावरण संपलं असं हे सांगतात. मला सांगा तिथे किती फौजा आहेत? आणि इतर फौजा आहे. इतक्या फौजा आणि लष्कर तिथे असूनही आपले जवान आणि अधिकारी मरत असतील तर त्याचं कारण काय?

### दूध का दूध और पानी का पानी

नेहरूंनी शेख अब्दुल्लांना लिहिलेलं हे पत्र आहे. 'संयुक्त राष्ट्राच्या अनुभवानंतर मी या निष्कर्षावर पोहोचलोय की तिथून कोणत्याही समाधानकारक उत्तराची अपेक्षा ठेवली जाऊ शकत नाही. मला युद्धबंदी हा एक चांगला निर्णय वाटला. पण या मुद्द्यावर योग्य पद्धतीने उत्तर शोधलं गेलं नाही. आम्ही युद्धबंदीवर अधिक विचार करून काही चांगला पर्याय शोधू शकलो असतो. मला वाटतं की भूतकाळात ही आमच्याकडून झालेली चूक आहे. मी नेहरूंचं पत्र वाचून दाखवत आहे. त्यांना चिडचिड करायचीच असेल, तर त्यांनी नेहरूंवर करायला पाहिजे", असंही अमित शाह म्हणालेपंडित नेहरूंची आणखी एक चूक संयुक्त राष्ट्रात भारत-पाकिस्तान वादाचा मुद्दा नेणं असं अमित शाह म्हणाले. "पंडित नेहरूंची चूक म्हणजे संयुक्त राष्ट्रात आपला मुद्दा घेऊन जाण्याची चूक. एका पत्रातल्या मजकुरातला एक भाग मी वाचून दाखवतो", असं म्हणत अमित शाह यांनी हातातील कागदावरचा एक मजकूर वाचून दाखवला.

# गडचिरोली पोलिसांना मोठे यश!

## जाळपोळीच्या गुन्ह्यांत सहभागी जहाल नक्षलवाद्यास अटक

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गडचिरोली पोलिसांनी (GADCHIROLI POLICE) नक्षल विरोधी मोहिमेत मोठे यश मिळाले आहे. चकमकी, जाळपोळीच्या गुन्ह्यांत सहभागी असलेल्या जहाल नक्षलवाद्यास गडचिरोली पोलिसांनी अटक केली आहे. महेंद्र वेलादी (वय 32) असे अटक करण्यात आलेल्या नक्षलवाद्याचे नाव आहे. अहेरी तालुक्यातील दामरंचा गावाजवळून त्याला ताब्यात घेण्यात आले.**



महेंद्र हा छत्तीसगड राज्यातील बिजापूर जिल्ह्यातील चेरपल्ली येथील रहिवासी असून, तो 2009 मध्ये नक्षल दलममध्ये सहभागी झाला होता. सुरुवातीला पुरवठा समिती आणि सध्या नॅशनल पार्क एरियामध्ये, त्यानंतर सँड्रा दलममध्ये कार्यरत होता. आज महेंद्र वेलादी हा दामरंचाजवळच्या इंद्रावती नदी परिसरात पोलिसांच्या हालचालींची माहिती देण्याच्या हेतूने फिरत होता. दामरंचा आणि मन्नेराजाराम या दोन्ही ठिकाणच्या पोलिस ठाण्यातील पोलिसांच्या हालचालींवर तो पाळत ठेवून होता, असे पोलिसांनी सांगितले. महेंद्र किष्टय्या वेलादी हा नक्षलवादी सन 2009 मध्ये माओवाद्यांच्या सप्लाय टीमचा सदस्य म्हणून काम करण्यास सुरुवात केली. माओवादी चेरपल्ली जंगल परिसरात आल्यानंतर तो त्यांची सेंत्री ड्युटी करायचा. तो सन 2010 पासून नॅशनल पार्क, बीजापूरच्या सॅण्ड्रा भागात सीपीआय (माओवादी) चा चेरपल्ली आरपीसीचा (रक्षा पार्टी कमीटी) सदस्य होता. महेंद्र वेलादी हा दोन चकमकींमध्ये सहभागी होता. डिसेंबर 2017 मध्ये मौजा सॅण्ड्रा जंगल परिसरात झालेल्या चकमकीमध्ये त्याने सहभाग घेतला होता. त्यानंतर डिसेंबर 2022 मध्ये गडचिरोली आणि बीजापूर पोलिसांच्या संयुक्त पथकासोबत मौजा टेकामेट्टा जंगल परिसरात झालेल्या चकमकीमध्ये तो सामील होता.

# 10 लाखांहून अधिक मनरेगा कार्ड केली रद्द

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (MNREGA) माध्यमातून करोडो लोकांना रोजगार मिळत आहे. यासाठी सरकार दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा निधी देते. यासाठी एक विशेष परिसंस्था तयार करण्यात आली आहे. यामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीला मनरेगा कार्ड (MNREGA CARD) दिले जाते. ज्या व्यक्तीकडे हे कार्ड आहे, त्याला रोजगार मिळू शकतं. आता केंद्र सरकारने 10 लाखांहून अधिक जॉब कार्ड (JOB CARD) रद्द केली आहेत. हे जॉब कार्ड का रद्द केली आहेत? याबाबतची माहिती आपण पाहणार आहोत. सरकारनं गेल्या 2 वर्षात लाखो मनरेगा जॉब कार्ड रद्द केले आहेत. यामागचे कारणही आता कळले आहे. खुद्द मोदी सरकारने संसदेत ही माहिती दिली आहे. ज्यांची कार्डे रद्द झाली आहेत त्यात तुमचे नाव आहे का? हे पाहणं गरजेचं आहे. 2021-22 आणि 2022-23 या दोन आर्थिक वर्षांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (महात्मा गांधी NREGS) अंतर्गत 'बनावट जॉब कार्ड' तयार करण्यात आली होती. यामुळं सरकारनं 10 लाखांहून अधिक जॉब कार्ड रद्द केली आहेत. सरकारने लोकसभेत याबाबतची माहिती दिली.

# फालतू सिनेमे ब्लॉकबस्टर ठरले

अभिनेता शाहरुख खानचा (SHAH RUKH KHAN) डंकी (DUNKI) हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर काही दिवसांपूर्वी रिलीज झाला. या ट्रेलरला प्रेक्षकांची पसंती मिळाली. आता शाहरुखच्या ट्विटरवरील आस्क एस आर के या सेशनमध्ये काही युझर्सनं शाहरुखला डंकी या चित्रपटाबद्दल काही प्रश्न विचारले आहेत. या प्रश्नांची शाहरुखनं उत्तरं दिली आहेत. एका नेटकऱ्यानं आस्क एस आर के या सेशनमध्ये शाहरुखला प्रश्न विचारला, "डंकीमध्ये सॅक्स सुक्स तर नाही ना? वडिलांसोबत चित्रपट पाहू शकतो ना?" या प्रश्नाला शाहरुखनं उत्तर दिलं, "सॅक्स सुक्स म्हणजे काय? ते मला कळालं नाही, पण तिकिटावर टॅक्स टूक्स आहे. तो तू वडिलांकडून घे" एका नेटकऱ्यानं शाहरुखला प्रश्न विचारला, "तू आमच्यासोबत डंकी चित्रपटाचा फर्स्ट डे फर्स्ट शो बघशील का? आम्ही तुला वचन देतो की, आम्ही तुझ्या बॉडीगार्डला त्रास देणार नाही आणि चांगले वागू". नेटकऱ्याच्या या प्रश्नाला शाहरुखनं उत्तर दिलं, "यार, मी हा सिनेमा पाच वेळा पाहिला आहे. जर तू सहाव्या वेळी चित्रपट पाहिला तर मी नक्की तुझ्यासोबत चित्रपट बघायला येईल" एका नेटकऱ्यानं शाहरुखला प्रश्न विचारला, "तुझ्या अत्यंत प्रभावी आणि कार्यक्षम पीआर टीममुळे तुझी गेले दोन फालतू सिनेमे ब्लॉकबस्टर ठरले. तुझा पीआर आणि मार्केटिंग टीमवर अजूनही विश्वास आहे का की, डंकी देखील हिट होईल? आणि हा चित्रपट बॉलिवुडमधील आणखी एक गोल्डन फालतू चित्रपट ठरेल?", हा प्रश्न विचारुन नेटकऱ्यानं शाहरुखसोबत पंगा घेतला. शाहरुखनं नेटकऱ्याच्या प्रश्नाला उत्तर दिलं, "साधारणपणे मी तुझ्यासारख्या बुद्धिमान लोकांना उत्तर देत नाही.



# अँजेलिना हॉलिवूड सोडण्याच्या तयारीत

हॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय अभिनेत्रींमध्ये अँजेलिना जोलीचे नाव आवर्जून घेतले जाते. तिच्या चाहत्यांची संख्या काही कमी नाही. तिने स्वत:च्या जोरावर हॉलिवूडमध्ये वेगळे स्थान निर्माण केले आहे. सध्या अँजेलिना जोली तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. काही काळापूर्वी तिने ब्रॅड पिटपासून घटस्फोट घेतला . तर आता अँजेलिना ही हॉलिवूड सोडण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. अँजेलिनाने अलीकडेच मीडियाशी संवाद साधला आहे. तिने यावेळी खुलासा केला की ती लॉस एंजेलिसमधून बाहेर पडण्याचा विचार करत आहे. ब्रॅड पिटपासून घटस्फोट आणि तिच्या कुटुंबाशी संबंधित कायदेशीर लढाईमुळे ती एलए सोडण्याचा विचार करत आहेत. यावेळी तिने सांगितले की, जर तिला आज तिला तिच्या करिअरची सुरुवात करायची असती तर ती अभिनेत्री बनली नसती. जेव्हा तिने अभिनय करायला सुरुवात केली तेव्हा गोष्टी वेगळ्या होत्या. आजच्या काळात तिला अभिनय करायला नक्कीच आवडेल, पण त्यात ती कधीच करिअर करणार नाही. अँजेलिना म्हणाली, 'मी आज अभिनेत्री होणार नाही. मी जेव्हा माझ्या करिअरला सुरुवात करत होते तेव्हा मला माहित नव्हते की मला इतक्या गोष्टी सार्वजनिक कराव्या लागतील. मी याची अपेक्षा केली नव्हती. कारण मी हॉलीवूडच्या आसपास वाढले होते. माझ्यावर त्याचा प्रभाव पडला नाही. मला ते कधीच महत्त्वाचे वाटले नाही. एलए सोडण्याबद्दल बोलताना ती म्हणाली म्हणाली, 'माझ्या घटस्फोटानंतर जे घडले त्याचा हा एक भाग आहे. अँजेलिनाने हॉलिवूड सोडण्यामागे अब्रॅड पिटपासून घटस्फोट घेण्याला कारणीभूत ठरवले. माझ्या घटस्फोटानंतर जे घडले त्याचाच हा एक भाग असल्याचे तिने सांगितले.




# जमाल कुडू' ला मिळाले लाखो व्ह्यूज

ॲनिमल (ANIMAL) हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर रेकॉर्ड ब्रेक कमाई केली आहे. चित्रपटामधील कलाकारांच्या अभिनयाचं अनेकजण कौतुक करत आहेत. अशातच आता टी-सीरिजच्या युट्यूब चॅनलवरुन ॲनिमल चित्रपटामधील बॉबी देओलचं एन्ट्री सॉंग रिलीज करण्यात आलं आहे.

हे गाणं रिलीज झाल्यानंतर युट्यूबवर ट्रेंड होत आहे. ॲनिमल चित्रपटामधील 'जमाल कुडू' हे बॉबी देओलचं म्हणजेच अबरारचं एन्ट्री सॉंग रिलीज करण्यात आलेलं आहे. हे गाणं टी-सीरिजच्या युट्यूब चॅनलवरुन शेअर करण्यात आलं आहे. या गाण्याला रिलीज होताच लाखो व्ह्यूज मिळाले आहेत. तसेच हे गाणं युट्यूबवर चौथ्या क्रमांकावर ट्रेंड होत आहे. ॲनिमल चित्रपट रिलीज झाल्यापासूनच बॉबी देओलच्या 'जमाल कुडू' या एन्ट्री सॉंगची चर्चा सोशल मीडियावर सुरु होती. अशातच हे गाणं आता रिलीज करण्यात आलं आहे. बॉबी देओलनं सोशल मीडियावर ॲनिमल या चित्रपटातील या गाण्याबाबत एक खास पोस्ट शेअर केली आहे. तुम्ही या गाण्याबद्दल विचारले आणि आम्ही तुमचे बोलणे ऐकले, आज तुमच्यासाठी हे गाणे रिलीज करत आहोत! अबरार एन्ट्री सॉंग जमाल कुडू आज रिलीज होत आहे" टी-सीरिजच्या युट्यूब चॅनलवर देण्यात आलेल्या क्रेडिटनुसार, हे गाणं क्लासिक इराणी बंदरी संगीत शैलीमधील आहे जे हर्षवर्धन रामेश्वर यांनी पुन्हा तयार केली. लहान मुलांचा कोरस देखील या गाण्यात ॲड करण्यात आला आहे. संदीप रेड्डी वंगा यांनी 'ॲनिमल' या चित्राचे दिग्दर्शन केलं आहे. या चित्रपटात रणबीर कपूर, रश्मिका मंदान्ना, बॉबी देओल, अनिल कपूर आणि तृप्ती डिमरी या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारली आहे. 'ॲनिमल' हा चित्रपट 1 डिसेंबर 2023 रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आला. रिलीजच्या पहिल्या दिवशी या चित्रपटानं भारतीय बॉक्स ऑफिसवर 63.8 कोटींची कमाई केली.

# ॲनिमल मधील 'त्या' डायलॉगवरुन नव्या वादाला सुरुवात

रणबीर कपूरच्या ॲनिलमनं एव्हाना सगळीकडे वेगवेगळ्या चर्चेला सुरुवात करुन दिली आहे. हा चित्रपट भलेही बॉक्स ऑफिसवर सुपरहिट झाला असेल मात्र आता त्यावरुन वेगवेगळ्या वादाला सुरुवात झाली आहे. खासकरुन महिला वर्गानं त्याबाबत नाराजी व्यक्त केल्याचे दिसून आले आहे. त्या चित्रपटामध्ये एक सीन आहे. ज्यात रणबीर कपूर हा रश्मिकाला म्हणतो की, महिन्यातून चारवेळा पॅड चेंज करताना किती नाटक करतेस तू. मी रोज ५० वेळा ते करतो आहे. त्या संवादावरुन सोशल मीडियावर मोठ्या वादाला सुरुवात झाली आहे. एकानं म्हटलं आहे की, त्या डायलॉगमधून उगाचच पीरियडसचा उल्लेख करण्याची गरज नव्हती. तसे केल्यानं दिग्दर्शक आणि कलाकार यांनी महिलांची नाराजी ओढावून घेतली आहे. त्यांच्यावर टीका होत आहे. जर तुम्हालाच काही माहिती नाही तर असे संवाद चित्रपटात घेताच कशाला, असेही काहींनी म्हटले आहे. महिलेला प्रत्येक महिन्याला तो त्रास होतो. पण




त्यामुळे तिचा काही मृत्यू होत नाही. पण त्या चित्रपटातून काहीही सांगून दिशाभूल करण्याचा आणि वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याच्या प्रतिक्रियांना उधाण आले आहे.काहींनी दिग्दर्शक रेड्डी आणि अभिनेता रणबीर कपूर यांच्यावर तीव्र शब्दांत आगपाखड केली आहे. एका युझर्सनं म्हटलं आहे की, ॲनिमलच्या लेखकाला कुणी सांगा की महिन्यात नव्हे तर दिवसभरातून चारवेळा पॅड बदलले जातात. दुसऱ्यानं लिहिलं आहे की, देवा हा किती मोठा अपमान आहे. लोकांना नेमकं काय आवडतं हेच आता कळेनासे झाले आहे, वांगानं डायपरला पॅड असे म्हटले आहे. त्यानं काय केलं आहे हेच त्याला माहिती नाही. रणबीर कपूरच्या ॲनिलमनं एव्हाना सगळीकडे वेगवेगळ्या चर्चेला सुरुवात करुन दिली आहे. हा चित्रपट भलेही बॉक्स ऑफिसवर सुपरहिट झाला असेल मात्र आता त्यावरुन वेगवेगळ्या वादाला सुरुवात झाली आहे. खासकरुन महिला वर्गानं त्याबाबत नाराजी व्यक्त केल्याचे दिसून आले आहे.

त्या चित्रपटामध्ये एक सीन आहे. ज्यात रणबीर कपूर हा रश्मिकाला म्हणतो की, महिन्यातून चारवेळा पॅड चेंज करताना किती नाटक करतेस तू. मी रोज ५० वेळा ते करतो आहे. त्या संवादावरुन सोशल मीडियावर मोठ्या वादाला सुरुवात झाली आहे.

# फिरकीचा नवा बादशाह मिळाला!

## » रवी बिश्नोई ठरला टी-20 क्रिकेटमध्ये नंबर वन गोलंदाज!

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय फिरकीपटू रवि बिश्नोई टी20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नंबर वन गोलंदाज ठरला आहे. रवि बिश्नोईने अफगाणिस्तानचा फिरकीपटू राशिद खानला मागे टाकलं आहे. नुकतीच त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-20 मालिकेत अप्रतिम कामगिरी केली. त्याला 'प्लेअर ऑफ द सिरीज'चा किताब मिळाला. आता आयसीसीने (ICC) त्याला मोठे बक्षीस दिले आहे.**



गेल्या वर्षाच्या सुरुवातीला बिश्नोईने (RAVI BISHNOI TOP BOWLER) आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्यानंतर या युवा फिरकीपटूने सातत्यपूर्ण कामगिरी केली. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-20 मालिकेपूर्वी तो आयसीसी क्रमवारीत पाचव्या स्थानावर होता. आता तो थेट अव्वल स्थानी पोहचला आहे. 699 रेटिंगसह बिश्नोई पहिल्या, तर राशिद खान 692 रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर आहे. श्रीलंकेचा वानिंदू हसरंगा 679 गुणांसह तिसऱ्या, इंग्लंडचा आदिल राशीद 679 गुणांसह चौथ्या आणि महीश थीक्षाणा 677 गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. दुसरीकडे, भारतीय फिरकी गोलंदाज अक्षर पटेलनेही 11 स्थानांची झेप घेत 16व्या स्थान मिळवले आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने नुकतीच ऑस्ट्रेलियाविरुद्धची टी-20 मालिका 4-1 अशी जिंकली. पाच सामन्यांच्या टी-20 मालिकेत भारतीय संघाची कामगिरी अतिशय उत्कृष्ट होती. या विजयासह सूर्याच्या युवा सेनेने वनडे विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीतील पराभवाचा हिशेब चुकता केला. T20 क्रिकेटला जागतिक क्रमवारीत एक नवा गोलंदाज मिळाला आहे. भारतीय फिरकी गोलंदाज रवी बिश्नोई आता ICC T20 आंतरराष्ट्रीय क्रमवारीत गोलंदाजीत पहिल्या स्थानावर पोहोचला आहे. रवि बिश्नोईने गेल्या अनेक महिन्यांपासून प्रथम स्थानावर विराजमान असलेल्या राशिद खानला बाजूला करत ही कामगिरी केली आहे. रवी बिश्नोईच्या खात्यात आता 699 गुण आहेत. तो राशिद खान (692) पेक्षा 7 रेटिंग गुणांनी पुढे गेला आहे. या यादीत श्रीलंकेचा वानिधू हसरंगा (679) तिसऱ्या क्रमांकावर, आदिल रशीद (679) चौथ्या क्रमांकावर आणि महिश तिक्षणा (677) पाचव्या स्थानावर आहे. म्हणजेच T20 आंतरराष्ट्रीय गोलंदाजांच्या क्रमवारीत फिरकीपटू अव्वल पाच नंबरवर स्थानांवर आहेत. ऑस्ट्रेलियाविरुद्ध नुकत्याच झालेल्या पाच सामन्यांच्या T20 मालिकेचा रवी बिश्नोईला खूप फायदा झाला. मालिकेत बिश्नोईने शानदार गोलंदाजी करत 5 सामन्यात 9 विकेट घेतल्या. विशेष म्हणजे या मालिकेत धावांचा पाऊस पडत असतानाही तो नियमितपणे विकेट घेण्यात यशस्वी ठरला. या कामगिरीसाठी त्याची 'प्लेअर ऑफ द सिरीज' म्हणूनही निवड झाली. रवी बिश्नोईने गेल्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. या फिरकीपटूने फेब्रुवारी 2022 मध्ये ईडन गार्डन्सवर वेस्ट इंडिजविरुद्ध पहिला आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. पहिल्याच सामन्यात तो 'प्लेअर ऑफ द मॅच' ठरला. त्याने 17 धावा देऊन दोन बळी घेतले. तेव्हापासून आजतागायत हा गोलंदाज टी-20 मध्ये सातत्याने सर्वोत्तम कामगिरी करत आहे. बिश्नोईने आतापर्यंत 21 सामने खेळले असून 17.38 च्या गोलंदाजीची सरासरी आणि 7.14 च्या इकॉनॉमी रेटने एकूण 34 बळी घेतले आहेत. त्याचा गोलंदाजीचा स्ट्राईक रेट 14.5 आहे.

### 699 रेटिंगसह बिश्नोई पहिल्या स्थानी

» गेल्या वर्षाच्या सुरुवातीला बिश्नोईने (RAVI BISHNOI TOP BOWLER) आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्यानंतर या युवा फिरकीपटूने सातत्यपूर्ण कामगिरी केली. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-20 मालिकेपूर्वी तो आयसीसी क्रमवारीत पाचव्या स्थानावर होता. आता तो थेट अव्वल स्थानी पोहचला आहे. 699 रेटिंगसह बिश्नोई पहिल्या, तर राशिद खान 692 रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर आहे. श्रीलंकेचा वानिंदू हसरंगा 679 गुणांसह तिसऱ्या, इंग्लंडचा आदिल राशीद 679 गुणांसह चौथ्या आणि महीश थीक्षाणा 677 गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. दुसरीकडे, भारतीय फिरकी गोलंदाज अक्षर पटेलनेही 11 स्थानांची झेप घेत 16व्या स्थान मिळवले आहे.

# कबड्डीपटूंना पालिका सेवेत करण्यासाठी धोरण ठरवणार

## » सरकारने खेळाला नेहमी प्राधान्य दिले : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील महापालिकेचे कबड्डी संघ असून त्यातील कबड्डीपटू कंत्राटवर आहेत. त्यांना पालिका सेवेत कायम करण्यासाठी धोरण तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी रात्री ठाण्यातील कार्यक्रमात बोलताना दिली. वर्तकनगर येथील धर्मवीर आनंद दिघे क्रीडा नगरी येथे प्रशांत जाधवर फाऊंडेशन आणि विठ्ठल क्रीडा मंडळाच्या वतीने कुमार गटाच्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद आणि निवड चाचणी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडला.**



दिवंगत आनंद दिघे यांनी नेहमी खेळाडूंना प्रोत्साहन दिले होते. त्यांनी राज्य, राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू निर्माण करण्याचे काम केले. तसेच सरकारने खेळाला नेहमी प्राधान्य दिले आहे. त्यात अगदी दहीहंडीपासून ते कबड्डीपर्यंतच्या खेळांचा समावेश आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. ठाणे महापालिकेचा कबड्डी संघ आहे. त्यातील खेळाडूंची कंत्राटी स्वरुपात नेमणुक करण्यात आली आहेत. या खेळाडूंना पालिका सेवेत कायम करण्याच्या सुचना पालिका आयुक्तांना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे राज्यातील महापालिकांमध्येही अशा स्वरुपाचा निर्णय घेण्यासाठी धोरण ठरविण्यात येईल, असे ते म्हणाले. या स्पर्धेतील कुमार गटाच्या अंतिम सामन्यात मुंबई उपनगर पश्चिम संघाने विजयासह नारायण नागु पाटील स्मृती फिरत्या चषकावर आपले नाव कोरले. तर या गटात पिंपरी चिंचवडचा संघ उपविजेता ठरला. कुमारी गटात पिंपरी चिंचवड संघाने प्रथम क्रमांकासह क्रीडाशिक्षक चंदन सखाराम पांडे स्मरणार्थ फिरत्या चषकावर आपले नाव कोरले. तर पुणे ग्रामीण संघाने उपविजेतेपद पटकाविले. कुमार गटात मुंबई उपनगर पश्चिम संघाने पिंपरी चिंचवड संघावर २७-१५ अशी मात करीत विजय मिळविला, मध्यंतराला मुंबई उपनगर पुर्व संघाकडे १०-८ अशी नाममात्र आघाडी होती. दोन्ही संघ तुल्यबळ असल्याने सुरवातीपासुन एकमेकांना अजमावत सावध खेळ करीत होते. मध्यंतरानंतर पिंपरी चिंचवडच्या संघाचा अनुभव कमी पडला आणि उपनगर पश्चिमचे आक्रमण थोपविण्यासह बचाव भेदण्यात यशस्वी झाले नाहीत. मुंबई उपनगर पश्चिमच्या रजत सिंग व ओम कुडले यांनी सुरवातीपासुनच आक्रमक खेळ केला.

### सरकारने खेळाला प्राधान्य दिले

» दिवंगत आनंद दिघे यांनी नेहमी खेळाडूंना प्रोत्साहन दिले होते. त्यांनी राज्य, राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू निर्माण करण्याचे काम केले. तसेच सरकारने खेळाला नेहमी प्राधान्य दिले आहे. त्यात अगदी दहीहंडीपासून ते कबड्डीपर्यंतच्या खेळांचा समावेश आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. ठाणे महापालिकेचा कबड्डी संघ आहे. त्यातील खेळाडूंची कंत्राटी स्वरुपात नेमणुक करण्यात आली आहेत. या खेळाडूंना पालिका सेवेत कायम करण्याच्या सुचना पालिका आयुक्तांना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे राज्यातील महापालिकांमध्येही अशा स्वरुपाचा निर्णय घेण्यासाठी धोरण ठरविण्यात येईल, असे ते म्हणाले. कुमारी गटात पिंपरी चिंचवड संघाने पुणे ग्रामीण संघावर ४४-२७ अशी मात करीत स्पर्धेचे विजेतपद मिळविले. पिंपरी चिंचवड संघाच्या मनिषा रोठोड व आर्या पाटील यांच्या खेळाने पुणे ग्रामीण संघावर सहज विजय मिळविला. पिंपरी चिंचवडच्या सिफा वस्ताद व भूमिका गोरे यांनी चांगल्या पकडी घेत विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.. या खेळाडूंना पालिका सेवेत कायम करण्याच्या सुचना पालिका आयुक्तांना दिल्या आहेत.